नागपूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक 20/12/2019 रोजी सकाळी 11–35 वाजता श्रीमंत राजे रघोजीराव भोसले नगरभवनात भरलेल्या स्थगित सर्व साधारण सभेचे कार्यवृत्त.

## उपस्थित सभासद

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | महापौर | |
| २. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | उपमहापौर | |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य | C१८ |
| ४. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या | A७ |
| ५. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या | C२५ |
| ६. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य | C१९ |
| ७. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या | D५ |
| ८. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य | D२३ |
| ९. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या | D११ |
| १०. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य | C५ |
| ११. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य | D२२ |
| १२. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य | B१३ |
| १३. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या | A८ |
| १४. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या | C१७ |
| १५. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या | C२१ |
| १६. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या | C२२ |
| १७. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य | C१३ |
| १८. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य | B१० |
| १९. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या | C२४ |
| २०. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य | C१४ |
| २१. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या | D३० |
| २२. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या | D३१ |
| २३. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या | D३३ |
| २४. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य | C६ |
| २५. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या | D८ |
| २६. | ८ | ब | अंसारी सय्यदा बेगम मो. निजामुद्दीन | सदस्या | D२७ |
| २७. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या | D१० |
| २८. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या | D७ |
| २९. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य | D३५ |
| ३०. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या | D३४ |
| ३१. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् | D३६ |
| ३२. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या | D१२ |
| ३३. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या | D१३ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ३४. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य | B१ |
| ३५. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या | A६ |
| ३६. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या | C३० |
| ३७. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य | B९ |
| ३८. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या | A४ |
| ३९. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य | D२० |
| ४०. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या | C२७ |
| ४१. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या | C२८ |
| ४२. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या | A५ |
| ४३. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या | C२९ |
| ४४. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य | B४० |
| ४५. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या | A१ |
| ४६. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या | C२६ |
| ४७. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य | B११ |
| ४८. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य | C२० |
| ४९. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या | A२१ |
| ५०. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या | A२० |
| ५१. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य | B२० |
| ५२. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या | A१९ |
| ५३. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या | D२ |
| ५४. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य | B२१ |
| ५५. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या | A२३ |
| ५६. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य | B१४ |
| ५७. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या | A२४ |
| ५८. | १९ | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य | B३ |
| ५९. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या | A१० |
| ६०. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य | D१८ |
| ६१. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य | B४ |
| ६२. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या | A२६ |
| ६३. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य | D२४ |
| ६४. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या | D१ |
| ६५. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य | B२२ |
| ६६. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य | B१५ |
| ६७. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या | A२७ |
| ६८. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या | A२८ |
| ६९. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य | B२३ |
| ७०. | २३ | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या | A२९ |
| ७१. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य | B५ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ७२. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य | B२४ |
| ७३. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या | A३ |
| ७४. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य | B१६ |
| ७५. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य | A३० |
| ७६. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या | A३१ |
| ७७. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य | B२५ |
| ७८. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य | B२६ |
| ७९. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या | A३२ |
| ८०. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य | C८ |
| ८१. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या | A२ |
| ८२. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या | A३३ |
| ८३. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य | B१७ |
| ८४. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या | D३ |
| ८५. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य | B२८ |
| ८६. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य | A३५ |
| ८७. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या | A३६ |
| ८८. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या | A१४ |
| ८९. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या | B३० |
| ९०. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या | A३७ |
| ९१. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्य | A३८ |
| ९२. | ३१ | ब | सतीया विठ्ठलराव होले | सदस्य | B६ |
| ९३. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या | A३९ |
| ९४. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य | B७ |
| ९५. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य | B३१ |
| ९६. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या | C३७ |
| ९७. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य | B१८ |
| ९८. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या | C३९ |
| ९९. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या | C४० |
| १००. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य | D२५ |
| १०१. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य | B३२ |
| १०२. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य | B३३ |
| १०३. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या | C३१ |
| १०४. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या | C३२ |
| १०५. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य | B३४ |
| १०६. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या | A१६ |
| १०७. | ३५ | क | विशाख प्रकाश मोहोड | सदस्या | C३३ |
| १०८. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य | B१२ |
| १०९. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या | C३४ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ११०. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या | A१७ |
| १११. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य | B३५ |
| ११२. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य | B३६ |
| ११३. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य | B३७ |
| ११४. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या | C३५ |
| ११५. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या | A१२ |
| ११६. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य | B३८ |
| ११७. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य | C४ |
| ११८. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या | D१६ |
| ११९. | ना.स. | | सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य | C९ |
| १२०. | ना.स. | | किशोर रामकृष्ण वानखेडे | सदस्य | C११ |
| १२१. | ना.स. | | निशांत गिरीश गांधी | सदस्य | C१२ |
| १२२. | ना.स. | | किशोर दामोदर जिचकार | सदस्य | D९ |

अनुपस्थित सभासद

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य | B१९ |
| २. | ५ | अ | दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या | C२३ |
| ३. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य | D२८ |
| ४. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य | D२९ |
| ५. | ७ | अ | विरंबा मुरलीधर भिवगडे | सदस्या | D३२ |
| ६. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य | C२ |
| ७. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य | C७ |
| ८. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य | D२१ |
| ९. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या | D१४ |
| १०. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या | D१५ |
| ११. | १२ | ड | जगदीश शिवदास ग्वालबंशी | सदस्य | B८ |
| १२. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य | C१५ |
| १३. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य | D१७ |
| १४. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य | B३९ |
| १५. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या | A१८ |
| १६. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य | B२ |
| १७. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या | A२२ |
| १८. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य | D२६ |
| १९. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या | A९ |
| २०. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या | A२५ |
| २१. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या | A११ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| २२. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य | C३ |
| २३. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या | A१३ |
| २४. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य | D१९ |
| २५. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या | B२७ |
| २६. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य | D४ |
| २७. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या | A३४ |
| २८. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य | B२९ |
| २९. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या | A१५ |
| ३०. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य | C१ |
| ३१. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या | C३६ |
| ३२. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या | C३८ |
| ३३. | ३८ | अ | उज्वला वसंतराव बनकर | सदस्या | D६ |
| ३४. | ना.स. | | गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य | C१० |

उपस्थित अधिकारी

| | |
|---|---|
| श्री. अभिजीत बांगर | आयुक्त |
| श्री. राजेश मोहिते | निगम सचिव |

मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

ठराव क्रमांक 6 :— मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील शोक प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने दोन मिनिटे शांत चित्ताने उभे राहून मृतात्म्यास मूक श्रध्दाजंली अर्पण करुन शोक प्रस्तावास सभाग्हाने एकमताने मान्यता प्रदान केली.

शोक प्रस्ताव

**डॉ. श्रीराम लागू**

आपल्या अभिजात अभिनयाने सिने आणि नाटय रसिकांच्या मनावर गेली पाच दशके अधिराज्य गाजविणारे, समाजाप्रति कृतज्ञता व्यक्त करत असताना सामाजिक दांभिकतेवर प्रहार करणारे खरेखुरे नटसम्राट डॉ. श्रीराम लागू यांचे दिनांक 17/12/2019 रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते 92 वर्षाचे होते.

डॉ. श्रीराम लागू यांचा जन्म 16 नोव्हेंबर, 1927 रोजी सातारा येथे झाला होता. वैद्यकीय शिक्षण घेत असतानाच श्रीराम लागू यांनी नाटकात काम करणे सुरू केले होते.

सामना, सिंहासन, पिंजरा यासारख्या अनेक सिनेमांमध्ये त्यांनी काम केले होते. वि. वि. शिरवाडकर यांच्या नटसम्राट या नाटकातली त्यांची अप्पासाहेब बेलवतकर ही भूमिका विशेष गाजली.

**गुरूदास दासगुप्ता**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (भाकप) ज्येष्ठ नेते, माजी खासदार तसेच श्रमिकांसाठी अहोरात्र लढा देणारे कणखर नेते गुरूदास दासगुप्ता यांचे दिनांक 30/09/2019 रोजी निधन झाले. ते 83 वर्षाच्या होते.

1985 साली गुरूदास दासगुप्ता पहिल्यांदा राज्यसभेवर खासदार बनले. त्यानंतर 2004 ते 2009 साली ते लोकसभेवर निवडून आले. 1950 ते 1960 या दशकात दासगुप्ता यांचे राजकारणात पदार्पण झाले होते.

## टी.एन. शेषन

देशाचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी.एन. शेषन यांचे दिनांक 10/11/2019 रोजी निधन झाले. ते 86 वर्षाचे होते.

आदर्श आचारसंहिता कठोरपणे राबविणारे व मतदारांना प्रथमच ओळखपत्र जारी करणारे कर्तव्यदक्ष निवडणूक आयुक्त म्हणून त्यांची जगभरात ख्याती झाली होती. निवडणूक सुधारणांसाठी त्यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांना रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## बाबासाहेब धाबेकर

माजी जलसंधारण मंत्री आणि कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबासाहेब धाबेकर यांचे 5 नोव्हेंबर, 2019 रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. ते 92 वर्षाचे होते.

1995 मध्ये कारंजातून अपक्ष म्हणून विजयी झालेल्या बाबासाहेबांच्या नेतृत्वात 42 अपक्ष आमदारांनी तेव्हाच्या युती सरकारला पाठिंबा दिला. बाबासाहेब तेव्हा मनोहर जोशींच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री झाले.

## नीलकंठ खाडिलकर

अग्रलेखांचा बादशाह अशी ओळख असणारे नवाकाळ दैनिकाचे संपादक व ज्येष्ठ पत्रकार नीलकंठ खाडिलकर यांचे दिनांक 22/11/2019 रोजी निधन झाले. ते 85 वर्षाचे होते.

खाडिलकर यांच्या झंझावती, मार्मिक आणि सामान्य वाचकालाही कळेल, अशा सोप्या भाषेतील अग्रलेखांची मराठी वृत्तपत्रसृष्टी गाजविली होता. त्यामुळेच त्यांना अग्रलेखांचा बादशहा अशी ओळख मिळाली होती.

## अरविंद इनामदार

महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक अरविंद इनामदार यांचे दिनांक 08/11/2019 रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. ते 79 वर्षाचे होते.

प्रामाणिक, न्यायप्रिय आणि कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी अशी इनामदार यांची ओळख होती. फक्त पोलीस महासंचालक म्हणून इनामदार यांची कारकीर्द गाजली नाही. तर साहित्य वर्तूळातही त्यांचा वावर होता. पोलीस लेखक म्हणूनही ते प्रसिध्द होते. खुसखुशीत भाषा शैली आणि विनोदबुध्दीमुळे ते ऐकणाऱ्यांच्या मनाची सहज पकड घेत असत.

## विजू खोटे

शोले चित्रपटातील 'कालिया' च्या भूमिकेने अजरामर झालेले ज्येष्ठ अभिनेते विजू खोटे यांचे दिनांक 30/09/2019 रोजी निधन झाले. ते 78 वर्षाचे होते.

विजू खोटे यांनी 300 हून अधिक मराठी–हिंदी चित्रपट आणि मालिकांमूधन अभिनय केला आहे. त्यांनी असंख्य छोटया भूमिका केल्या असल्या तरी त्यांचे अभिनय कौशल्य आणि संवादफेक अप्रतिम असल्याने त्या दर्शकांच्या कायम लक्षात राहिल्या.

## वसंतराव अनवाणे

कामगार नेते आणि माजी नगरसेवक वसंतराव बळीराम अनवाणे यांचे दिनांक14/11/2019 रोजी निधन झाले. ते 89 वर्षाचे होते.

## गिरिजा कीर

बालसाहित्यकार कथाकथनकार आणि सिध्दहस्त लेखिका गिरिजा कीर यांचे दिनांक 31/09/2019 रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्या 86 वर्षाच्या होत्या.

गिरिज कीर यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान मोठे होते. यांनी आतापर्यंत 115 पुस्तके लिहिली आहेत. बालसाहित्याची त्यांनी सर्वाधिक निर्मिती केली. कथा, कादंबरी, मुलाखती, प्रवासवर्णने आदी विविध प्रकारची साहित्य निर्मिती त्यांनी केली. 1968 ते 1978 या काळात 'अनुराधा' मासिकाच्या सहाय्यक संपादक म्हणूनही त्यांनी काम केले.

## डॉ. योगेश कुंभलकर

शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगार मिळवून देण्याचे उद्दिष्ट साध्य करणारे डॉ. योगेश कुंभलकर यांचे दिनांक 08/11/2019 रोजी निधन झाले.

गणेशपेठ सारख्या स्लम भागात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्नीकल एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून ते संस्थापक सचिव पदावर कार्यरत होते. संस्थेच्या माध्यमातून अनेक व्यवसायिक प्रशिक्षण, तांत्रिक प्रशिक्षण शाळा, महाविद्यालयाची स्थापना केली. भारतातील पहिली कम्प्युटर इन्स्टिटयुट त्यांनी उभारली. ते राष्ट्रवादीचे महाराष्ट्र प्रदेश ओबीसी सेलचे महासचिव व जिल्हा कार्यकारणीचे उपाध्यक्ष राहिले होते.

## श्याम धर्माधिकारी

नागपूरकरांना सिनेमा समजावून सांगणारा रंगकर्मी अशी ओळख असणारे ज्येष्ठ चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि रंगकर्मी श्याम धर्माधिकारी यांचे दिनांक 04/11/2019 रोजी निधन झाले. ते 62 वर्षाचे होते.

नागपूरकर कलावंतांना चित्रपटात स्थान मिळावे म्हणून ते सातत्याने धडपडत होते. नाटक हौसेपोटी नव्हे तर आर्थिक मिळकत मिळावी म्हणून व्यावसायिक नाटक उभारण्यावर त्यांचा भर होता.

## राजा द्रोणकर

नागपूर शहर जिल्हा युवक कॉंग्रेस कमिटीचे महासचिव, बिल्डर असोसिएशन नागपूरचे माजी अध्यक्ष आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते राजा द्रोणकर यांचे दिनांक 14/11/2019 रोजी निधन झाले. ते 54 वर्षाचे होते.

द्रोणकर यांनी लष्करीबाग या मागास वस्तीतून विद्यार्थीदशेपासूनच आंबेडकरी चळवळीत स्वतःला झोकून दिले होते. युवकांच्या अनेक आंदोलनात ते सक्रीय होते. पुढे शहर जिल्हा युवक क्रॉंग्रेसचे अध्यक्षपदी त्यांनी नियुक्ती झाली.

## ज्योतिराम अय्यर

संगीत क्षेत्रात 'व्हाईस ऑफ रफी' म्हणून ओळख असलेले प्रसिध्द गायक टी.एस. ज्योतिराम अय्यर यांचे दिनांक 14/11/2019 रोजी निधन झाले. ते 67 वर्षाचे होते.

गायक मोहम्मद रफी यांच्या आवाजाशी साधर्म्य साधणारा त्यांचा आवाज रसिकांना चांगलाच पसंतीस पडला होता.

## अरूण काकडे

अविष्कार नाटयसंस्थेचे आधारस्तंभ व समांतर रंगभूमीवरील रंगायनचे संस्थापक अरूण काकडे यांचे दिनांक 09/10/2019 रोजी निधन झाले. ते 89 वर्षाचे होते.

अरूण काकडे 94 व्या अखिल भारतीय नाटयसंमेलनाचे ते अध्यक्षही होते. त्यांचे 'अमका' हे आत्मचरित्रही प्रसिध्द झाले होते. काकडे यांना संगीत नाटक अकादमी, झी मराठी जीवनगौरव, ध्यास–सन्मान या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## बैनाबाई रोहणकर

प्रभाग क्र. 25 (क) च्या नगरसेविका वैशाली रोहणकर यांच्या आजी श्रीमती बैनाबाई रामचंद्रजी रोहणकर यांचे दिनांक 09/11/2019 रोजी निधन झाले. त्या 105 वर्षाच्या होत्या.

## मौलाना बयजीद खान

ताजाबाद शरीफच्या शाही मशिदीचे शाही इमाम अजरत अल्लामा मौलाना बयजीद खान साहेब यांचे दिनांक 15/11/2019 रोजी निधन झाले. ते 97 वर्षाचे होते.

त्यांच्या कुटुंबाला साक्षात ताजुद्दीन बाबा यांनी शाही इमाम हा सन्मान दिला होता. त्यांना ताजुद्दीन बाबांचा आर्शीवाद होता. गेली 78 वर्षे त्यांनी शाही मशिद येथे शाही इमाम म्हणून अल्लाहची इबादत केली.

उपरोक्त सर्व मान्यवरांच्या निधनाबद्दल म.न.पा.च्या या सभेस अत्यंत दुःख होत आहे. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांवर ओढविलेल्या या दुःखद प्रसंगी त्यांना तोंड देण्यास धैर्य प्रदान करो, हीच प्रभू चरणी प्रार्थना.

यानंतर मा. महापौरजी यांनी 2 मिनिट उभे राहून मृतात्म्यास श्रद्धांजली अर्पण केली.

वंदे मात्रम नंतर मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

ठराव क्रमांक 7:– मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजुरी प्रदान केली.

## अभिनंदन प्रस्ताव

## रामजन्म भूमीबाबत सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

देशातील कोटयवधी लोकांनी हजारो वर्षापासून पाहिलेले अयोध्येतील रामजन्मभूमीवर प्रभु श्रीरामचंद्राचे भव्य मंदीर उभारण्याचे स्वप्न साकार होण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने मागील अनेक वर्षापासून प्रदीर्घ काळ रेंगाळलेला प्रश्न निकालात काढतांना अयोध्येतील वादग्रस्त 2.77 एकर जमीन रामललाच्या मालकीची आहे असा ऐतिहासिक निर्णय दिला आहे. तसेच देशातील मुस्लीम अल्पसंख्याक समाजाला उपासनेसाठी अयोध्येत 5 एकर पर्यायी जमीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय दिला. मंदिर निमिती आणि व्यवस्थापनासाठी ट्रस्ट बनविण्याचा आदेश देवून राममंदीर उभारणीचा मार्ग मोकळा केला आहे. अश्याप्रकारे दोन्ही समाजात सामंजस्य निर्माण करणारा ऐतिहासिक व संतुलित निकाल सर्वोच्च न्यायालयाचे पाच सदस्यीय घटनापीठाने दिल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे सन्माननीय सरन्यायाधीशासह सर्व न्यायमूर्तीचे नागपूर महानगरपालिकेची ही सभा विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करते तसेच या निर्णयाने देशात शांतता व सौहार्द निर्माण होईल असा विश्वास व्यक्त करते.

न्या. शरद बोबडे

सर्वोच्च न्यायालयाचे 47 वे सरन्यायाधीश म्हणून ज्येष्ठतम न्यायाधीश व नागपूरचे सुपूत्र न्यायमूर्ती शरद अरविंद बोबडे यांनी सुत्रे स्वीकारली आहेत.

न्या. शरद बोबडे यांचा जन्म 24 एप्रिल 1956 रोजी नागपूरात झाला. नागपूर विद्यापिठातून बी.ए., एल.एल.बी. केल्यानंतर 1978 मध्ये त्यांनी वकीलीस सुरूवात केली. 1998 मध्ये सिनिअर कौन्सिल म्हणून त्यांना मान्यता मिळाली. तसेच अनेक वर्षे नागपूर महानगरपालिकेचे सिनिअर स्टॅडींग कौन्सिल म्हणूनही त्यांनी काम पाहिले. मार्च 2000 मध्ये मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश, ऑक्टोंबर 2012 मध्ये मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश तर एप्रिल 2013 मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांनी गेल्या सहा वर्षात अनेक महत्वाचे निकाल दिले. त्यांचे आजोबा निष्णात वकील होते. तर वडील अरविंद बोबडे हे महाराष्ट्राचे दोन वेळा ॲडव्होकेट जनरल होते. अश्या या निष्णात वकीली घराण्याचा वारसा लाभलेल्या न्यायमूर्ती शरद बोबडे यांची भारताचे सरन्यायधीश म्हणून निवड झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे. शहराचा अभिमान म्हणून त्यांचा नागरी सत्कार करणे हे आमचे कर्तव्य आहे.

नरेंद्र मोदी/अमित शहा

राज्यघटनेच्या अनुच्छेद 370 अन्वये जम्मू काश्मीरला दिलेला विशेष दर्जा रद्द करून राज्याचे विभाजन करून दोन केंद्रशासित प्रदेश करण्याच्या ऐतिहासिक व धाडसी पावलाचा निर्णय भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमीत शहा यांनी घेतल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधेः– मा. महापौरजी,राज्यघटनेच्या अनुच्छेद 370 रद्द करण्यासंदर्भात जो ठराव आपण अभिनंदनासाठी घेतला आहे त्याला कॉग्रेस पक्षाचा विरोध आहे. अशा पध्दतीचा निर्णय केंद्र सरकाने केला त्या बद्दल महापालिकेची ही सभा अभिनंदन करते. या निर्णयाचा विरोध आम्ही करतो. आमचा विरोध नोंदविण्यात यावा.

महापौरः–विरोध नोंदविण्यात यावा.

श्री. संदीप सहारेः– मा. महापौरजी, 26 नोहेंबर 2019 ला आयुक्त साहेबांना एक निवेदन दिले होते. या देशाचे प्रशासन लोकशाहीच्या धर्तीवर चालते ते संविधान नावाचा आमचा जो ग्रंथ आहे. त्या संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन व्हावे.

उध्दव ठाकरे

शिवसेना पक्ष प्रमुख श्री. उध्दव ठाकरे यांची महाराष्ट्र राज्याचे 29 वे मुख्यमंत्री म्हणुन निवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळ

महाराष्ट्र राज्याचे मंत्रिमंडळात श्री. एकनाथ शिंदे, श्री. छगन भुजबळ, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. सुभाष देसाई, श्री. जयंत पाटील यांच्यासह उत्तर नागपूरचे नवनिर्वाचित आमदार व माजी पालकमंत्री डॉ. नितीन राऊत यांची कॅबीनेट मंत्री म्हणून निवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा सर्व मंत्री महोदयांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

नानाभाऊ पटोले/डॉ. निलम गोऱ्हे /देवेंद्र फडणवीस/प्रवीण दरेकर

साकोली विधान सभा मतदार संघाचे काँग्रेसचे आमदार श्री. नानाभाऊ पटोले यांची विधानसभेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. शिवसेनेच्या डॉ. निलम गोऱ्हे यांची विधानपरिषदेच्या उपसभापती पदी निवड करण्यात आली तसेच माजी मुख्यमंत्री व भाजपाचे

गटनेते तथा दक्षिण–पश्चिम नागपूरचे आमदार श्री. देवेंद्र फडणवीस यांची महाराष्ट्र विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी तर भाजपाचे श्री. प्रवीण दरेकर यांची विधानपरिषदेच्या विरोधी पक्षनेते पदी निवड करण्यात आली. या सर्व मान्यवरांनी आपआपला पदभार स्विकारला असून सर्वांचे नागपूर महानगरपालिकेची ही सभा विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

अभिनंदन प्रस्ताव

नागपूर जिल्ह्यातील श्री. अनिल देखमुख (काटोल), श्री. सुनील केदार (सावनेर), श्री. समीर मेघे (हिंगणा), श्री. राजू पारवे (उमरेड), श्री. देवेंद्र फडणवीस (दक्षिण–पश्चिम नागपूर), श्री. मोहन मते (दक्षिण नागपूर), श्री. कृष्णा खोपडे (पूर्व नागपूर), श्री. विकास कुंभारे (मध्य नागपूर), श्री. विकास ठाकरे (पश्चिम नागपूर), डॉ. नितीन राऊत (उत्तर नागपूर) आणि श्री. टेकचंद सावरकर (कामठी) महाराष्ट्र विधानसभेवर सदस्यपदी निवडून आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा सर्व आमदारांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

मनोहरलाल खट्टर

भाजपाचे ज्येष्ठ नेते मनोहरलाल खट्टर यांची हरियानाचे मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सुमेध वाघमारे

'सिव्हील राईट्स प्राटेक्शन सेल' तर्फे देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील 'सी.आर. पी.सी.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार 'लोकमत' चे वरिष्ठ उपसंपादक सुमेध वाघमारे यांच्यासह डॉ. राजाभाऊ टांकसाळे व प्रज्ञा बेसेकर यांना हे पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

विलास डांगरे

होमियोपॅथी तज्ञ डॉ. विलास डांगरे यांना संतकवी कमलासुत स्मृती 'सत्संग' पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

मनिष सोनी / योगेश पांडे

राज्य शासनाच्या वतीने दिला जाणारा अनंत गोपाळे शेवडे पुरस्काराने नागपूर नागपूर महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी श्री. मनीष सोनी तर दैनिक लोकमत चे श्री. योगेश पांडे, लोकसत्ताचे मंगेश राऊत, महाराष्ट्र टाइम्सचे प्रवीण लोणकर यांना नुकतेच सन्मानीत करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा या सर्वांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

राजीव कुशवाहा

वर्ल्ड मार्केटिंग कॉंग्रेस व्दारा नागपूर टुडे ई–पोर्टलला ''ब्रॉन्ड लिडर शिप अवार्ड'' प्राप्त झाला असून नागपूर टुडे ई–पोर्टल चे प्रतिनिधी राजीव कुशवाहा यांना सन्मानित करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

कौस्तुभ चॅटर्जी

पर्यावरण संरक्षणासाठी जगभरात कार्यरत असलेल्या अर्थ डे नेटवर्कच्या माध्यमातून भारतातील शहरांसाठी 'शहर ग्रीन करो' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नागपूर शहराचा समावेश विजेत्या उत्कृष्ठ दहा शहरांमध्ये झाला आहे. नागपूरातील ग्रीन व्हीजल फाऊंडेशन या पर्यावरणवादी संस्थेसोबत नागपूर महानगरपालिकेचा सहभाग आहे.

नागपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवल्या गेल्यामुळे ग्रीन व्हीजल फाऊंडेशनचे संस्थापक कौस्तुभ चॅटर्जी व त्यांच्या टीमचे नागपूर महानगरपालिकेची ही सभा विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

लांब उडी, थाळी फेक, गोळा फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक

नॅशनल स्पोर्ट्स ॲण्ड फिजिकल फिटनेस बोर्डच्या वतीने राजस्थानमधील अजमेर येथे आयोजित नॅशनल स्पोर्ट्स ॲण्ड फिजिकल फिटनेस चॅम्पियनशीमध्ये नागपूर महानगरपालिकेच्या वाल्मिकीनगर हिंदी माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरीचे प्रदर्शन केले.

राष्ट्रीय स्पर्धेमध्ये प्रथम स्थान पटकविणाऱ्या पूनम पवार (थाळी फेक), विशाल रावत (लांब उडी), संजना ठाकुर (लांब उडी), भेषज वैष्णव (गोळा फेक) व रघुराज तिवारी (लांब उडी) या पाचही खेळाडूंसह प्रशिक्षक नितीन भोळे व मुख्याध्यापिका संध्या मेडपल्लीवार यांनी आंतराष्ट्रीय पातळीवर शहराचे व आपल्या मनपाच्या शाळेचे नांव लौकीक केल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

प्रा. अनोमा साखरे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पाली प्राकृत विभागाती प्राध्यापिका अनोमा साखरे यांना पाली भाषेतील उत्कृष्ट संशाधनासाठी मानव संशोधन विकास मंत्रालयाचा महर्षी भद्रायन व्यास राष्ट्रपती सन्मानाने पुरस्कृत करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

इरशाद अहमद

पुणे येथील पीवायसी हिंदू जिमखाना येथे पार पडलेल्या आठव्या आयसीएफ वर्ल्ड कॅरम चॅम्पियनशिपमध्ये नागपूरातील प्रतिभावंत आंतरराष्ट्रीय कॅरमपटू इरशाद अहमद चॅम्पियन ठरले. जगज्जेता प्रशांत मोरे यांचा 2–1 अशा फरकाने पराभव करीत नागपूर नगरीचे नांव लौकिक केल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

हिमानी फडके

दुसऱ्या अखिल भारतीय खुली सागरी जलतरण स्पर्धेत देवबाग बीच येथे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत नागपूरातील शार्क ॲक्वेटिक स्पोर्टिंग संघटनेची आंतरराष्ट्रीय जलतरणपटू हिमानी फडकेने 1 तास 29.80 सेकंदाची वेळ नोंदवीत प्रथम क्रमांक प्राप्त करीत सुवर्ण पदक प्राप्त करून सर्वात वेगवान जलतरणपटूचा बहुमान पटकाविल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

जब्बार पटेल

शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाटयसंमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिध्द चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक जब्बार पटेल यांची निवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

महापौर :- मा.सदस्य श्री.विरेंद्र कुकरेजा यांनी पण एक अभिनंदन प्रस्ताव दिला आहे त्याचे सुध्दा वाचन या ठिकाणी करण्यात यावे.

उपायुक्त( श्री.मोहिते) :- मा.महापौरजी, आज दिनांक २०/१२ च्या सभेत खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहापुढे ठेवावा व त्याचे वाचन व्हावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, हा विषय न्यायप्रविष्ठ आहे. मा.उच्च न्यायालयात या संशोधनातील याचिका प्रलंबित आहे. असे असतांना असा अभिनंदन प्रस्ताव आणू शकतो काय? याचे उत्तर देण्यात यावे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, आपण त्यामध्ये काही हस्तक्षेप करीत नाही. मा.सदस्यांनी तो प्रस्ताव आणला आहे त्याचे वाचन करण्यात यावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, न्यायप्रविष्ट असतांना असा कुठलाही विषय सभागृहात घेता येणार नाही. असा कुठलाही विषय सभागृहामध्ये घेता कामा नये.

(बेल)

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी लोकसभा और राज्यसभा ने इस कानुन को पारित करने के पश्चात यह कानुन इस देश मे लागू किया गया है या नही ? कृपया प्रशासन इसकी जानकारी सभागृह के पटल पर रखे ।

उपायुक्त (श्री.मोहिते) :- मा.महापौरजी, संसदेने पारीत केलेल्या कायदयाचे सर्व राज्यामध्ये अंमलबजावणी सुरु आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, हा कायदा चॅलेज करण्याची अथॉरिटी मा. सुप्रीम कोर्टामध्ये आहे. संसदेने केलेले सर्व कायदे ते चॅलेंज करता येऊ शकते. त्या संदर्भात संविधानात तरतुद आहे. त्या अनुषंगाने हा प्रस्ताव सध्या न्यायप्रविष्ट आहे. तो कायदा न्यायप्रविष्ट आहे त्याच्या अंमलबजावणीच्या संदर्भात, आणि न्यायप्रविष्ट असलेल्या प्रकरणात या पध्दतीचा ठराव घेता येत नाही.

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, संसद मे कानुन बनाने के बाद, संसद पर प्रगल्भ चर्चा होने के बाद यह कानुन पारीत किया गया। कानुन पर राष्ट्रपतीजी ने हस्ताक्षर कर दिये और राष्ट्रपतीजीने हस्ताक्षर करने के बाद मे अनेक राज्य मे लागू किया गया। कानुन की कार्यप्रणाली पर किसी प्रकार का स्थगनादेश न्यायालयने नही दिया है और कानुन पर किसी प्रकार का स्थगनादेश न देने के कारण किसी भी प्रकार से हम उस कानुन मे परावर्तन को लेकर किसी प्रकार का विषय यहा पर लेकर नही आ रहे है और हमारी क्षमता भी नही है हम केवल अभिनंदन का विषय को लेकर यहापर लाये है और मे स्पष्ट रुप से पुरी संजीदगी के साथ कानुन पर यह बात कहता हुँ किसी ठराव का अभिनंदन करना वह न्यायप्रविष्ट मामले मे हस्तक्षेप नही है, न्यायप्रविष्ट मामले मे सभागृह मे लेकर के हस्तक्षेप न करना यह गैरसंवैधानिक है, गैरसंसदीय है लेकीन उसका अभिनंदन और निषेध करना गैरसंसदीय नही है इसलिये इस विषय का अभिनंदन प्रस्ताव लिया जाये।

उपायुक्त (श्री.मोहिते ):- मा.महापौरजी, नागरिकता(संशोधन) अधिनियम, २०१९ पाकिस्तान, बांग्लादेश एवं अफगानिस्तान मे धार्मिक उत्पीडन के शिकार असंख्य शरणार्थियो के जीवन मे आशा की एक नई किरण लेकर आया है। धर्म के आधार पर भारत विभाजन का दंश झेल रहे है अगणित परिवारो को इससे नया जीवन मिलेगा। उत्पीडित, वयक्त एवं निराश्रितो को गले लगाकर 'वसुधैव कुटुंबकम' की प्राचीन भारतीय परंपरा के अनुरुप यह निर्णय निश्चित ही एक गौरवपुर्ण भारत की परिकल्पना को चरितार्थ करता है। इस निर्णय से हर भारतीय का मस्तिष्क ऊंचा हुआ है।

देश के अनेक चिरलंबित समस्याओं का अत्याधिक कुशलता से समाधान करने के लिए मोदी सरकार को आनेवाले समय में जाना जाएगा । इन समस्याओं के समाधान के लिए दृढ राजनैतिक इच्छाशक्ति, अट्ठ प्रतिबध्दता, पूर्ण समर्पण, दूरदर्शिता तथा हदय में राष्ट्र सर्वोपरि की भावना की आवश्यकता थी। ये समस्याये वोट-बॅक और तुष्टीकरण की राजनीति के कारण खडी की गई कई प्रकार की बाधाओं से और भी अधिक जटिल प्रतीत होती थी । प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी की करिश्माई एवं दूरदर्शी नेतृत्व में जिस प्रकार से इन समस्याओं का समाधान निकाला गया है, उससे यह कहने में अब कोई संशय नहीं है कि देश प्रगति एवं विकास के पथ पर अब बढ चला है । इसलिये मा. नरेंद्र मोदी सरकार गृहमंत्री अमित शाह एवमं सभी सांसदो का हार्दिक अभिनंदन.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, या प्रस्तावाच्या संदर्भात मत मांडण्याचा अधिकार आम्हाला आहे. मा.महापौरजी, संसदेने जो कायदा सिटीजन अमेडमेंट बिल मंजूर केले हे मा.दयाभैय्या ने सांगितले. कायदा

तयार करण्याची संसदेची एक प्रक्रीया आहे. दोन्ही सभागृहामध्ये त्यावर चर्चा होऊन मा.राष्ट्रपती महोदयांनी त्याच्यावर सही केली आणि त्याचे रुपांतर कायदयामध्ये झालेले आहे. मा.महापौरजी हा कायदा केल्यानंतर सुप्रीम कोर्टामध्ये चॅलेंज करण्यात आला आणि कुठलाही कायदा तयार झाल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीच्या संदर्भात लोकांमध्ये विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. आणि या कायदयाच्या अंमलबजावणीच्या संदर्भात, या कायदयाच्या भुमिकेच्या संदर्भात, आज देशभरामध्ये मोठया प्रमाणात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. संपुर्ण देश पेटलेला आहे.

श्री.दिपक चौधरी :- मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, कायदा पास झाला, राज्यसभा लोकसभेमध्ये आणि त्यावर मा.राष्ट्रपती महोदयांची सही झाली. त्यामध्ये ते अभिनंदनास पात्र सुध्दा आहे. त्यामध्ये काही असंवैधानिक तत्व, समाजकटंक, काही पक्ष या लोकांनीच या राज्यामध्ये गोंधळ निर्माण केला आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, संपुर्ण देश पेटलेला आहे. मोठया प्रमाणामध्ये असंतोष निर्माण झाला असून सर्व धर्मीयांमध्ये झालेला आहे. दिल्ली ,मुंबई, पुर्वोत्तर राज्य तर धगधगुन राहिले आहे. अशा परिस्थितीमध्ये या कायदयाचे अभिनंदन करणे यथोचित होणार नाही. न्यायोचित होणार नाही. कारण की समाजातील एका वर्गाला तो एका विशीष्ट धर्माचा नाही. हे सर्वधर्मीय युवक युवती मोठया संख्येने अनेक विद्यापीठामधुन रस्त्यावर येऊन राहिले आहे काल मुंबईमध्ये असेल, पुण्यामध्ये असेल, दिल्लीमध्ये असेल, मराठवाडयामध्ये आहे काल नागपूरमध्ये सुध्दा कायदयाच्या विरोधात विरोध प्रदर्शन झाले. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेने जो कायदा वादातील आहे अशा वादातील कायदयाचे अभिनंदन करणे मला असे वाटते ते यथोचित होणार नाही, न्यायोचित होणार नाही. या देशाच्या विभाजनाच्या संदर्भात हा निर्णय घेतला आहे. विभाजन करण्याच्या मनिषेतून हा कायदा आणला, त्यामध्ये मा.प्रधानमंत्र्यांचे आणि मा.गृहमंत्र्यांचे अभिनंदन महानगरपालिकेच्या या सभागृहाने करणे योग्य होणार नाही.

श्री.विरेंद्र कुकरेजा :- मा.महापौरजी,सन्माननिय सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधेजी ने जो कहा वह उनकी व्यक्तीगत भावना हो सकती है। जब १९४७ मे विभाजन हुआ तो बहोत सारे शरणार्थीको १९५१ तक आने का मौका नही मिला, तब सरकाने ने अचानक से निर्णय ले लिया, जो लोग वहापर छुट गये, उनकी आज वहा क्या परिस्थिती है।

श्री.तानाजी वनवे :- पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, मा.सदस्य कुकरेजाजी ने जो राजकारणाचा आरोप घेतला आहे. कुठलिही गोष्ट कायदयाला धरुन असते, राजकारण करण्याचा यामध्ये कुठलाही संबंध नाही.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, मा.विरोधी पक्ष नेता ने पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन घेतली यामध्ये त्यांना काय इन्फॉर्मेशन हवी आहे हे सभागृहासमोर सांगावे.

श्री.प्रुफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन त्यांनी सभागृहाला दिलेली आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन हे सभागृहाला देण्यासाठी नाही. पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन हे प्रशासनाकडुन इन्फॉर्मेशन घेण्यासाठी असतो.

श्री.प्रुफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, ठीक आहे. आम्ही दयाभैय्या कडुन खुप काही शिकत आहे. आणि शिकुन राहिलो आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, या सभागृहाची सभा संचालनाची जी समिती आहे त्यामध्ये मी आणि प्रफुल्लजी एकत्र होतो. हे नविन नाही आहे.

श्री.प्रुफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मी अजुनही आपला विद्यार्थी आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मी हे स्वीकृत करतो.

श्री.प्रुफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मी मान्य करतो.

श्री.विरेंद्र कुकरेजा :- मा.महापौरजी, इसमे पंजाबी समाज, शिख समाज,बौध्द समाज, जैन समाज,

ईसाई समाज, ख्रिश्चन समाज, इन सभी की पाकिस्तान हो, बांग्लादेश हो, अफगानीस्तान हो, वहा रहनी की परिस्थिती बहोत दयनिय है। मै मा.प्रधानमंत्री जी और मा.गृहमंत्रीजी और विशेष रुप से वह सहयोगी सांसद जिन्होने बिल को समर्थन दिया उनका बहोत बहोत अभिनंदन करता हु।

श्री.प्रुफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, ज्या पध्दतीने आमचे मित्र श्री.विरेंद्र कुकरेजा यांनी फाळणीचा विषय या ठिकाणी ठेवला आहे. फाळणी ही या देशाची अत्यंत दुर्देवी घटना होती. दुख:दायक होती. ही कोणी केली हा महत्वाचा प्रश्न आहे. या विचारांचे बिजांकुर कधी रोवल्या गेले, वीर राष्ट्रवादाचा पुळका या देशात कोणी निर्माण केला याचा पण आपण अभ्यास करुन घ्यावा.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, कोणी केला, त्याचे सर्वप्रथम नाव या सभागृहात घ्यावे.

श्री.प्रुफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, या संदर्भामध्ये आपण सुध्दा माहिती घ्यावी. मी विषयाच्या खोलात जात नाही. सिटीजन अमेंडमेंट बिलमध्ये नागरिकत्व सिध्द करावे लागणार आहे. माझे नागरिकत्व सिध्द करावे लागणार आहे. हा वादातील कायदा आहे आणि या विषयामध्ये जनआंदोलन निर्माण झाले आहे. काल नागपूर मध्ये सुध्दा मोठे आंदोलन झाले आणि या स्थितीमध्ये आपण अभिनंदन घेत आहे आणि त्यामुळे आपण कुणाच्यातरी भावना दुखावण्याचा प्रयत्न करीत आहे. या शहराची एक परंम्परा आहे सर्वसमावेशक आहे या शहरामध्ये कधीही जातीय दंगे झालेले नाही. सर्व धर्माचे लोक या शहरामध्ये राहत असतांना या शहराचा एक इतिहास आहे. गौरवशाली परंम्परा आहे.

(बेल)

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, या विषयावर जर चर्चा करायची आहे तर माझी आपणाला सभागृहात विनंती आहे की या विषयापासून चर्चा सुरु करावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, सिटीजन बिलाच्या संदर्भामध्ये या सभागृहामध्ये चर्चा करण्याची क्षमता या सभागृहाची आणि माझी तर नाही.

(बेल)

(कॉग्रेस पक्षाने अभिनंदन प्रस्तावाला विरोध दर्शवून सभागृहाचा त्याग केला)

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या या सभागृहामध्ये कायदयाचे अभिनंदन करण्याच्या प्रस्तावावर ही चर्चा सुरु आहे की अभिनंदन करीत आहे. आपण जर या विषयावर चर्चा घेणार असु तर तो वेगळा विषय आहे. हा अभिनंदनाचा प्रस्ताव आहे की त्यावर चर्चा आहे ?

महापौर :- हा फक्त अभिनंदन प्रस्ताव आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, मग सभागृहामध्ये त्यावर चर्चा कशाला करायची. विषयपत्रिकेवर अनेक विषय आहे त्यावर आपण चर्चा का करीत नाही.

श्री.मनोज सांगाळे :- मा.महापौरजी, आपल्या सभागृहाचा वेळ वाया जात आहे.

(बेल)

महापौर :- कॉग्रेस पक्षाचा विरोध नोंदवून या ठिकाणी अभिनंदन प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. विषय क्र. ६ व विषय क्र ७ चे वाचन करावे.

उपायुक्त श्री.मोहिते :- (वाचले)

**ठराव क्र.- ८ :–** परिवहन समिती मधील मा.श्री. जितेंद्र धनराज कुकडे, सभापती व सदस्य पदाचा यांनी दिनांक 11.12. 2019 रोजी राजीनामा दिला असल्यामुळे एक (1) रिक्त झालेल्या सदस्या ऐवजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २७ (४) अन्वये भारतीय जनता पक्षातर्फे एका (1) सदस्यांचे नामनिर्देशन परिवहन समितीच्या सन 2019–20 व 2020–21 च्या (उर्वरित कालावधीकरिता) करावयाचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला (भारतीय जनता पक्षातर्फे मा.सत्तापक्ष नेता श्री.संदीप जाधव यांनी नामनिर्देशित सदस्यांची एक (1) नाव बंद लखोटयात मा.महापौरजी यांचेकडे सादर केले)

मा.महापौरजी यांचेकडे सत्तापक्ष नेता यांनी सादर केलेल्या बंद लखोटयातील नाव मा.महापौरजी यांनी वाचून दाखविले. त्यानुसार मा.सदस्य श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर यांचे नामनिर्देशन परिवहन समितीच्या सन 2019–20 व 2020–21 च्या (उर्वरित कालावधीकरिता)करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजात बहुमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्र.- ९ :–** कर आकारणी व कर संकलन विशेष समिती मधील

मा.श्री. संदीप चंद्रभानजी जाधव, सभापती व सदस्य पदाचा यांनी दिनांक 12.12.2019 रोजी आपले पदाचा राजीनामा दिला असल्यामुळे या समितीमध्ये एक (1) रिक्त झालेल्या सदस्य ऐवजी भारतीय जनता पक्षातर्फे एका (1) सदस्यांचे नामनिर्देशन कर आकारणी व कर संकलन विशेष समितीच्या सन 2019–2020 च्या (उर्वरित कालावधीकरिता) करावयाचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

( भारतीय जनता पक्षातर्फे मा. सत्तापक्ष नेता श्री. संदीप जाधव यांनी नामनिर्देषित

सदस्यांचे एक (1) नाव बंद लखोटयात मा. महापौरजी यांचेकडे सादर केले.)

**मा.महापौरजी** यांचेकडे सत्तापक्ष नेता **यांनी सादर केलेल्या बंद लखोटयातील नाव** मा. महापौरजी यांनी **वाचून दाखविले. त्यानुसार** मा.सदस्य **श्री.**अविनाश ठाकरे यांचे नामनिर्देशन कर आकारणी व कर संकलन विशेष समितीच्या सन 2019–2020 च्या (उर्वरित कालावधीकरिता) **करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजात बहूमताने मंजुरी प्रदान केली.**

ठराव क्र.- १० :— बहुजन समाज पक्षातर्फे गटनेत्या श्रीमती वैशाली अविनाश नारनवरे, यांचे दिनांक २३-०८-२०१९ चे पत्रान्वये त्यांना स्मार्ट सिटीमध्ये नामनिर्देशीत संचालक म्हणून नेमणूक करण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मंजुरी प्रदान केली.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, आज सभागृहात मा.आयुक्त नाही आहे. या विषयामध्ये कुठे लिजचा विषय आहे. कुठे तारण ठेवण्याचा विषय आहे. माझी आपणाला विनंती आहे समजा क्षमतेचे अधिकारी श्री.राम जोशी साहेब असतील, कारण की या विषयावर चर्चा करावी लागणार आहे. बिना चर्चेने हा विषय मंजूर करु नये या मताचे संपुर्ण सभागृह आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की मा.आयुक्त जर येत असेल तर ही सभा चालवावी नाहीतर त्यांची पुढची वेळ घेऊन सभा स्थगित करावी.

महापौर :- आयुक्त साहेब चिफ सेक्रेटरीच्या बैठकीमध्ये आहे. त्यामुळे येणे शक्य नाही.

श्री.संदीप जाधव :- मा.महापौरजी, विषयपत्रिकेवर ३९ विषय आहे आणि महत्वाचे विषय आहे. आणि चर्चा आता शक्य नाही आहे त्यामुळे आयुक्त महोदय नसल्यामुळे ही सभा स्थगित करण्यात यावी. आणि पुढच्या सभेमध्ये बाकीच्या विषय घेण्यात यावे.

ठराव क्र.- ११:- भांडेवाडी येथिल नागपूर महानगरपालिकेच्या मलनिस्सारण केंद्राची १०० MLD वरून २०० MLD क्षमतावाढ करण्यात आलेली आहे. जुलै २०१८ पासून हा प्रकल्प कार्यान्वित झालेला आहे. हा प्रकल्प PPP तत्वावर (Deferred Payment) वर करण्यात आलेला आहे. सन २०१९-२० च्या वार्षिक अर्थसंकल्पामध्ये वरिल पदाअंतर्गत रू. ७३२० लक्ष ची मागणी विभागाव्दारे करण्यात आलेली आहे. परंतू या मध्ये मा. आयुक्त यांचे सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात रू ३००० लक्ष तरतुद उपलब्ध करून दिलेली होती. तदनंतर वरील रू ३००० लक्ष ची तरतूद मा. स्थायी समितीने वाढवून ४००० लक्ष ची तरतूद देण्यात आलेली आहे. २०० MLD प्रकल्प जुलै २०१८ पासून कार्यान्वीत झाल्यामुळे PPP Operator यांना माहे मार्च २०२० पर्यंत खालील प्रमाणे भुगतान करणे आवश्यक आहे. याकरिता दरवर्षी अंदाजे रू. ६.८ कोटी प्रति महिन्याप्रमाणे सन २०१९-२० करिता रू. ७३.२० कोटीची वाढीव तरतूद उपलब्ध करण्याकरिता यथायोग्य पदातून समायोजन करण्याचा प्रश्न स्थायी समितीने ठराव क्र. ६६४/विषय क्र. ६४७ नुसार दि. २९-११-२०१९ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 104 च्या अनुषंगाने खर्चाचे पुनःसमायोजन करण्याचा खालील प्रमाणे प्रस्तावास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते. आणखी असे की या प्रस्तावातील पुनःसमायोजन राशीच्या अतिरीक्त जो खर्च लागणार आहे त्या खर्चाची तरतुद आयुक्त, म.न.पा. यांनी सुधारीत अर्थसंकल्प 2019–2020 मध्ये तशी तरतुद करावी अशी ही स्थायी समितीने निर्देश दिले. तसेच उपरोक्त प्रस्ताव महासभेकडे अंतिम मंजूरी देण्याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील “१ (जे)” प्रमाणे नोटीस.

| अर्थसंकल्पीय पद क्रमांक | विशदीकरणात्मक व्यय शिर्ष ( प्राथमिक व्यय घटक ) Illustrative Of Other FUNCTION GROUP | प्राधिकृत विभाग | २०१९-२०२० प्रस्तावित | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मा. म.न.पा. महासभेद्वारे स्विकृत | घट | वाढ | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| A23902330818 | मलनिस्सारण प्रक्रिया केंद्र, भांडेवाडी | S.T.P. | 4000.00 | 0.00 | 2000.00 | 6000.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| A20200441804 | बांधील महसुली खर्चाची तरतुद उपलब्ध करणे (Committed Expenditure) | ACCOUNTS AND FINANCE | 2550.00 | 530.00 | 0.00 | 2020.00 |
| A43902371915 | दक्षिण S.T.P. केंद्रासाठी म.न.पा. चा सहभाग | S.T.P. | 500.00 | 500.00 | 0.00 | 0.00 |
| A43902371916 | अशुध्द जल व मलनिस्सारण संस्करण प्रकल्प ( D-WAT ) (नागरी वस्तीतील नाल्यात सोडलेल्या अशुध्द व सांडपाण्याचा वाहीकेवर व शहरातील निर्माण झालेल्या उद्याना साठी प्रायोगिक तत्वावर S.T.P. पथदर्शी प्रकल्प) | S.T.P. | 50.00 | 10.00 | 0.00 | 40.00 |
| A43902371917 | Gobbian बंधारे निर्माण | S.T.P. | 25.00 | 10.00 | 0.00 | 15.00 |
| A43902371919 | लघु मल नित्सा:रण केंद्र (हुडकेश्वर व नरसाळाकरीता व ईतर) | S.T.P. | 1000.00 | 900.00 | 0.00 | 100.00 |
| A43901774820 | भांडेवाडी येथे सी.एन.जी. तयार करणारा प्रकल्प उभारणे | S.T.P. | 50.00 | 50.00 | 0.00 | 0.00 |
| | प्रस्तावित घट व वाढ महसुली तसेच भांडवली एकुण व्यय | | 8175.00 | 2000.00 | 2000.00 | 8175.00 |

*उपरोक्त नोटीस सभागृहाने विचारात घेऊन मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जाधव यांनी खालीलप्रमाणे केलेल्या फेरबदलाच्या सूचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते* या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजात बहुमताने मंजूरी प्रदान केली

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०३ व १०४ च्या अनुषंगाने खर्चाचे पुन:समायोजन करण्याचा खालील प्रमाणे प्रस्तावास स्थायी समिती ठराव क्र. ६६४ दि. २९/११/२०१९ अन्वये ही महासभा एकमताने मंजूरी प्रदान करते. आणखी असे की या प्रस्तावातील पुन:समायोजन राशीच्या अतिरीक्त जो खर्च A२३९०२३३०८१८ मलनिस्सारण प्रक्रिया केंद्र, भांडेवाडी या पदाअंतर्गत लागणार आहे त्या खर्चाची तरतुद आयुक्त, म.न.पा. यांनी सुधारीत अर्थसंकल्प २०१९-२०२० मध्ये तशी तरतुद करावी अशी ही महासभा निर्देश देते.

| अर्थसंकल्पीय पद क्रमांक | विशदीकरणात्मक व्यय शिर्ष ( प्राथमिक व्यय घटक ) Illustrative Of Other FUNCTION GROUP | प्राधिकृत विभाग | २०१९-२०२० प्रस्तावित | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मा. म.न.पा. महासभेद्वारे स्विकृत | घट | वाढ | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| A23902330818 | मलनिस्सारण प्रक्रिया केंद्र, भांडेवाडी | S.T.P. | 4000.00 | 0.00 | 2000.00 | 6000.00 |
| A20200441804 | बांधील महसुली खर्चाची तरतुद उपलब्ध करणे (Committed Expenditure) | ACCOUNTS AND FINANCE | 2550.00 | 530.00 | 0.00 | 2020.00 |
| A43902371915 | दक्षिण S.T.P. केंद्रासाठी म.न.पा. चा सहभाग | S.T.P. | 500.00 | 500.00 | 0.00 | 0.00 |
| A43902371916 | अशुध्द जल व मलनिस्सारण संस्करण प्रकल्प ( D-WAT ) (नागरी वस्तीतील नाल्यात सोडलेल्या अशुध्द व सांडपाण्याचा वाहीकेवर व शहरातील निर्माण झालेल्या उद्याना साठी प्रायोगिक तत्वावर S.T.P. पथदर्शी प्रकल्प) | S.T.P. | 50.00 | 10.00 | 0.00 | 40.00 |
| A43902371917 | Gobbian बंधारे निर्माण | S.T.P. | 25.00 | 10.00 | 0.00 | 15.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| A43902371919 | लघु मल नित्सा:रण केंद्र<br>(हुडकेश्वर व नरसाळाकरीता व ईतर) | S.T.P. | 1000.00 | 900.00 | 0.00 | 100.00 |
| A43901774820 | भांडेवाडी येथे सी.एन.जी. तयार करणारा प्रकल्प उभारणे | S.T.P. | 50.00 | 50.00 | 0.00 | 0.00 |
| A42001470511 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रस्ते विकास कार्यक्रम<br>(सिमेंट काँक्रीटचे रस्ते निर्माण टप्पा १ करीता रु.३५०० लक्ष राशी उपराजधानी करीता विशेष अनुदानातुन राखीव तसेच उपराजधानी करीता विशेष अनुदानातुन प्रस्तावित सिमेंट काँक्रीटचे रस्ते निर्माणा करीता मा. अध्यक्ष स्थायी समिती यांचे पुर्वपरवानगी नुसार प्रावधानासाठी राखीव व रु.४२०० लक्ष राशी राखीव) | P.W.D. | 7000.00 | 0.00 | 700.00 | 7700.00 |
| A22001330803 | शहरातील इतर रस्त्याचे डांबरीकरण सुस्थीती व दुरुस्ती करणे व काँक्रिटीकरण करणे<br>(उपराजधानी नागपूर शहर विकासासाठी प्राप्त विशेष अनुदानातून प्रस्तावित) | P.W.D. | 3500.00 | 0.00 | 700.00 | 4200.00 |
| A42001374603 | नागपूर नगरी करीता विविध विकास कामे | P.W.D. | 500.00 | 0.00 | 500.00 | 1000.00 |
| A42001374604 | नागपूर नगरीतील इतर नागरी सुखसोयी करीता विविध विकास कामे<br>(मा. उपमहापौर रु. ३०० लक्ष व रु. ८०० लक्ष राशी मा. अध्यक्ष स्थायी समिती यांचे आदेशानुसार प्रावधानासाठी राखीव अतिरिक्त रु. १०० लक्ष राशी राखीव.) | P.W.D. | 1100.00 | 0.00 | 100.00 | 1200.00 |
| A42800771237 | मछली मार्केट व म.न.पा. च्या जागेवर इतर नवीन भाजी मार्केट निर्माण व विस्तार<br>(मनपा निधी मधुन रु.३०० लक्ष राखीव)<br>१)जरीपटका भाजी मार्केट निर्माण करीता रु.१५० लक्ष राखीव.<br>प्रत्येक विधान सभा क्षेत्रात मनपा च्या जागेवर भाजी मार्केट व फुड मॉल निर्माण करणे<br>(उपराजधानी नागपूर शहर विकासासाठी प्राप्त विशेष अनुदानातून रु. १०० लक्ष राखीव) | P.W.D. | 1800.00 | 1400.00 | 0.00 | 400.00 |
| A46701373513 | पुतळयांचे निर्माण | P.W.D. | 250.00 | 100.00 | 0.00 | 150.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| A21001822602 | **शहरविकास योजने चा प्रस्तावित आराखडा तयार करणे व विकास योजना अंमलबजावणी** | T.P. | 1500.00 | 500.00 | 0.00 | 1000.00 |
| | **प्रस्तावित घट व वाढ महसुली तसेच भांडवली एकुण व्यय** | | 23825.00 | 4000.00 | 4000.00 | 23825.00 |

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी, आम्ही २६ तारखेला निवेदन दिले होते की सर्वसाधारण सभा सुरु होण्याच्या आधी संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करावे कारण संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यामध्ये या सभागृहामध्ये काहीतरी अडचण येत आहे काय ? आज महाराष्ट्र राज्य शासनाने सुध्दा संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन केले, नागपूर जिल्हा परिषदेने तेथुन याची सुरुवात केली होती.

महापौर :- संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यास मुळीच अडचण नाही. पुढच्या सभागृहात त्याचे वाचन करावे .

श्री.संदीप जाधव :- पुढच्या सर्वसाधारण सभेत संविधानाच्या प्रस्ताविकेचे नक्की वाचन होईल.

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्‍चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

राजेश म. मोहिते
निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

श्री. संदीप दिवाकर जोशी
महापौर
महानगरपालिका,नागपूर